**<u>प्रेस नोट</u>**

पोलीस अधिक्षक,कार्यालय अकोला
दिनांक :-१२/०४/२०१८

# २४ तासात परत मिळवुण दिले १,०९,५०० रुपये

सायबर पोलीस ठाणे अकोला येथे दिनांक १०/०४/२०१८ रोजी अर्जदार सुधाकर मधुकर वानखडे,रा.ढोणे कॉलनी शिवर अकोला यांनी तक्रार दिली की, त्यांनी बजाज फायनान्स मधुन फायनान्सवर मोबाईल विकत घेतला होता त्यानंतर त्यांना क्रेडीट कार्ड देण्यात आले होते.मोबईलच्या संपुर्ण किस्त भरणा केल्यानंतर त्यांना दिनांक-१०/०४/२०१८ रोजी बजाज फायनान्स मधुन फोन आला की तुमचे क्रेडीट कार्ड बंद करण्यात येत आहे.तुम्हाला क्रेडीट कार्ड सुरु ठेवायचे आहे काय.त्यांनी हो म्हटल्यावर बजाज फायनान्स कडुन त्यांना एक संदेश आला व त्यांना विचारण्यात आले संदेश मध्ये ६ आकडे दिले आहेत ते बरोबर आहे काय त्यांनी बरोबर असल्याचे सांगीतले नंतर दुसरा संदेश आला की त्यांचे अकाउन्ट मधुन ६४,५५० रुपये काढण्यात आले.नंतर बजाज फायनान्समध्ये गेल्यानंतर त्यांची ६४,५५०रु.ची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले.

तसेच अर्जदार सुधिर गणपत बंड,रा.माळीपुरा अकोला यांनी तक्रार दिली की बजाज फायनान्स मधुन फोन क्र. १)८६७७९८५४०, २) ०२०६९९११७०० फोन आला व त्यांना सांगीतले की तुमचे जुने कार्ड बंद होणार आहे.आम्ही नवीन कार्ड देणार आहोत तुमचे मोबाईलवर दोन-दोन मिनीटांनी मॅसेज येतील ते आम्हाला सांगा वरुन त्यांनी माहिती दिली. नंतर थोडया वेळानी पुन्हा फोन आला व त्यांनी सांगीतले की तुमच्या कार्डवरुन ४५,००० रुपयच्या दोन वस्तु खरेदी केल्या असल्याचे सांगीतले. नंतर बजाज फायनान्समध्ये गेल्यानंतर त्यांची ४५०००रु.ची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले.

वरील दोन्ही फिर्यादी यांनी तात्काळ पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला येथे संपर्क साधला असता श्री.एम.राकेश कलासागर, पोलीस अधीक्षक, अकोला, विजयकांत सागर, अपर पोलीस अधीक्षक, अकोला यांनी तात्काळ तपास करण्याचे सायबर पोलीस स्टेशनला आदेशीत केले.

सायबर पोलीस ठाणे चे अधिकारी/कर्मचारी यांनी तत्परता दाखवत तात्काळ तपास सुरु केला असता दोन्ही फिर्यादीचे पैसे हे फ्लीपकार्ड वरुन खरेदी केल्याचे निदर्शनास आल्याने फ्लिपकार्डचे नोडल अधिकारी यांचे शी संपर्क साधुन खरेदी करण्यात आलेल्या सामानाची डिलीव्हरी थांबवून ठेवणेबाबत सांगीतले. दोन्ही फिर्यादींचे एकुण **१,०९,५०० रुपयाची** होणारी फसवणूक थांबवण्यात आली.

जानेवारी २०१७ ते आज पावेतो OTP देउन फसवणूक झालेल्या अकोला जिल्हयातील नागरीकांचे सायबर पोलीस स्टेशनने एकुण **नऊ (९) लाख रुपये** परत मिळवुण दिले आहेत.

सदरची कार्यवाही श्री.एम.राकेश कलासागर, पोलीस अधीक्षक, अकोला, विजयकांत सागर, अपर पोलीस अधीक्षक, अकोला यांचे मार्गदर्शनात सायबर पोलीस स्टेशनचे प्रवीण धुमाळ,सहायक पोलीस निरीक्षक,पोलीस कॉन्स्टेबल अतुल अजने यांनी केली.

**“मी बॅंक अधिकारी बोलत आहे” असे सांगून ग्राहकांकडुन तुमचे खाते बंद होईल किंवा कार्ड ब्लॉक होईल अशी भिती घालून ATM कार्ड बाबत माहिती विचारण्यात येते कोणतीही बॅंक कोणत्याही ग्राहकाचे बॅंक खाते आणि ATM कार्ड विषयी माहिती (सोळा अंकी क्रमांक,पीन,पासवर्ड,सिव्हीव्ही क्रमांक,एक्सपायरी दिनांक ) विचारत नाहीत.अशी कोणतीही माहिती ग्राहकांनी फोनवर देउ नये.असे आवाहन मा.श्री.एम.राकेश कलासागर, पोलीस अधीक्षक, अकोला यांनी केले आहे.**

**प्रति,**

**संपादक ,दैनिक ...........................................................**
**कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.**